# सर्वांसाठी उपचारांचे स्वप्न हवेतच!





**स्वस्त दरातील औषधे आणि सर्वसामान्य जनतेला परवडतील असे उपचार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मोदी सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. जेनेरिक औषधे, परवडतील अशा किमतीत स्टेंट अशा महत्त्वाच्या टप्प्याबरोबर आरोग्यसेवेची हमी हे त्यांच्या धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य ठरले. प्राथमिक आरोग्यसेवांची व्याप्ती वाढवण्याची त्यांची नीती असली तरी वास्तव त्यापासून कोसो दूर आहे. त्याचबरोबर मागील वर्षभरात डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्यांनंतर त्यांना संरक्षण देण्याची अपेक्षा आहे.**




- पुढील सात वर्षांत एचआयव्हीला हद्दपार करण्यासाठी केंद्रीय धोरणात्मक योजना. त्यासाठी 'एचआयव्हीसाठी चाचणी आणि औषधोपचार' धोरण.
- सर्वांना मोफत आरोग्यसेवा धोरण. सर्व सरकारी रुग्णालयात आपत्कालीन सेवा मोफत देण्याची घोषणा.
- आयुष मंत्रालयाची स्थापना ९ नोव्हेंबर,२०१४. आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपथी (आयुष) एकाच छत्राखाली. ३०० कोटींची तरतूद.
- राष्ट्रीय आरोग्यनिती (२०१५) प्राथमिक सुविधांची व्याप्ती वाढवणे आणि आकस्मिक वैद्यकीय खर्चासाठी गरीब कुटुंबाना आरोग्य सेवेचे उद्दिष्ट.
- राष्ट्रीय आरोग्य पोर्टल १४नोव्हेंबर २०१४ रोजी सुरू. आरोग्य साक्षरता वाढवणे आणि रोगांवर प्रतिबंधात्मक जनजागृती हा उद्देश.
- देशातील पहिले मानसिक आरोग्य धोरण ऑक्टोबर २०१४मध्ये
- एम्स रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा. सहा राज्यांत नव्याने एम्स रुग्णालयांना मान्यता. महाराष्ट्रात नागपूर.
- आरोग्य सेवांची तरतूद दुपटीने म्हणजे तीन टक्क्यांपर्यंत वाढवून आरोग्य विमा योजना विकसित करण्याचा निर्णय.
- योगप्रसार हा आरोग्याचा भाग. त्यामुळे योगप्रशिक्षण, अंगिकार याला विशेष महत्त्व. मधुमेह-अतिरक्तदाब प्रतिबंध यावर भर






### डॉक्टरांवरील हल्ले, आंदोलनं

महाराष्ट्रातील धुळे आणि मुंबई उपचारांत हलगर्जी केलेल्या कारणावरून रुग्णांच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना मारहाण केली. या घटनेचे पडसाद महाराष्ट्रच नाही तर देशभरात उमटले. त्यानंतर डॉक्टरांचा संप, आंदोलनं आणि रुग्णसेवेवर झालेल्या परिणामामुळे आरोग्य क्षेत्र ढवळून निघाले. डॉक्टरांवरील हल्ले रोखण्यासाठी केंद्रीय कायदा व्हावा, अशी मागणी .

### दिलासा आणि टीकाही

- ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज स्टडी (जीबीडी) नुसार आरोग्य निर्देशांकांत भारताचा क्रमांक अन्य देशांच्या तुलनेत १५४ इतका आहे. ही दिलासादायक स्थिती. हे मोदी सरकारचं मोठं यश मानलं तरी लॅन्सेटमध्ये मोदी सरकारच्या अग्रक्रमात आरोग्याला पुरेसे स्थान नसल्याची टीकाही झाली
- सुपर स्पेशालिटी सेवा देण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये रुग्णालये सुसज्ज आणि मध्यम वर्गासाठी परवडतील अशी उपचार सुविधा हे केंद्राचे धोरण सध्या तरी कागदावरच. ०आरोग्य धोरणाचा अद्याप काहीच परिणाम आरोग्य सेवांवर झालेला नाही.

### नियंत्रण नाही

- खासगी आरोग्यसेवा अजूनही सर्वसामान्यांच्या आवाक्यापलीकडे.
- शुल्काबाबत काहीच नियंत्रण नाही.
- स्टेंटच्या किंमतीबाबत सरकारने धोरण जाहीर केलं तरी सरकारी आणि खासगी रुग्णालये अशा नियंत्रणांना जुमानत नाहीत, अशीच स्थिती.
- खासगी विमा कंपन्यांनी मेडिक्लेमसाठी अटी अधिक जाचक होऊनही सरकारचे नियंत्रण नाही.

संकलन - अपर्णा पाटील



### सार्वजनिक आरोग्यसेवा सलाइनवर

- सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याची भयावह उदाहरणं.
- सरकारी रुग्णालयात डॉक्टर, पारिचारिकांची संख्यावाढ नाही.
- सायकलवरून, खांद्यावरून नातेवाईकांचे मृतदेह आणण्याच्या घटना.
- जालंधरमध्ये सरकारी रुग्णालयाच्या प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे कामगाराला आपल्या वडिलांचा मृतदेह हातागाडीवरून न्यावा लागला.
- डेंग्यू, मलेरियाच्या साथींमुळे शहरी भागांतही मृत्यू, रुग्णांची अक्षम्य हेळसांड.

### महिला आणि बालके

- लसीकरणाचा विस्तार. बालकांमधील मृत्यू आणि आजार कमी करण्यासाठी इंद्रधनुष्य अभियान. १ जानेवारी, २०१६पासून चार लसी मोफत.
- मदर अँड चाइल्ड ट्रॅकींग सिस्टीम. गरोदर मातांना एसएमएसद्वारे कशी काळजी घ्यावी, यासंबंधी मार्गदर्शन.

### जेनरिक औषधांचा आग्रह

- देशभरातील डॉक्टरांना जेनेरिक औषधे लिहून देण्याचा आदेश. जो आदेशाचे पालन करणार नाही, त्या डॉक्टरांविरोधात कारवाई.
- शिवाय प्रिस्क्रिप्शन ही कॅपिटल अक्षरात असावेत, असेही निर्देश.

### बेटी बचाओ

- स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना. त्यासाठी १०० कोटींची तरतूद.
- दुर्गम भागासाठी टेलि-मेडिसीन पोर्टल. टेलिमेडिसीन योजनेंतर्गत दिल्लीतल्या एम्स आणि मुंबईतल्या केईएममधील डॉक्टरांचा सल्ला घेणं शक्य. त्यासाठी इस्रोची मदत.

### अवयवदानासाठी ॲप

राष्ट्रीय आरोग्य अभियानचा निधी वाढवला. आरोग्य सुविधा देण्यासाठी केंद्राचा वाटा दोन टक्के तर राज्याचा आठ टक्के असला तरी राज्याला घसघशीत निधी.

### 'पीसीपीएनडीटी'चा बोजवारा

- पीसीपीएनडीटी कायद्या विरोधात रेडिओलॉजिस्टचा संप
- अनेक राज्यांत कायद्याच्या अंमलबजावणीचा बोजवारा

# शेतकरी करणार शहरांची कोंडी

## १ जूनपासून आंदोलन; मुंबई, पुण्याचा दूध, भाजीपाला रोखणार

**म. टा. प्रतिनिधी,** शिर्डी

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव व इतर मागण्यांसाठी राज्यातील शेतकरी येत्या १ जूनपासून संप पुकारणार आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नगर, सोलापूरसह राज्यातील सर्व शहरांची कोंडी करण्यासाठी हे संपकरी शेतकरी या शहरांचा दूध, भाजीपाला, अन्नधान्य पुरवठा रोखणार आहेत.

राज्यभरातील शेतकरी संपाची रणनीती ठरवण्यासाठी सोमवारी पुणतांबे येथे राज्यातील सर्व शेतकरी संघटना, त्यांचे प्रतिनिधींची दिवसभर बैठक झाली. त्यात व्यूहरचना आखण्यात आली. २५ ते ३१ मे या काळात पुणतांबे गावासह राज्यातील प्रत्येक तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला. शेतकऱ्यांचा सातबारा कर्जमुक्त करा, शेतमालाला हमी भाव, कृषीसाठी मोफत वीज पुरवठा, शेतकऱ्यांना पेन्शन योजना, डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी तत्काळ लागू करा, दुधाला प्रति लिटर ५० रुपये दर, ठिबक व तुषार सिंचनसाठी १०० टक्के अनुदान या मागण्यांचा पुकारा करण्यात आला. यापूर्वी नगर जिल्ह्यातील पुणतांबे येथे ३ एप्रिल रोजी विशेष ग्रामसभेने ठराव मंजूर केला होता. या संपाला नगर, पुणे, नाशिक, सातारा, मराठवाडा, कोल्हापूर येथील बहुसंख्य गावांनी ठराव करून त्यास पाठिंबा दिला आहे.

सोमवारी पुणतांबे येथे चांगदेव महाराज मंदिरात तिसरी राज्यस्तरीय बैठक झाली. या बैठकीला शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील, स्वाभिमान शेतकरी संघटनेचे पदाधिकारी तसेच शेतकरी असे २०० जण उपस्थित होते. या प्रश्नावर रान पेटविण्यासाठी सातारा, सांगली, सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात जनजागृती मोहीम आज, मंगळवारपासून हाती घेण्यात येईल, असे प्रतिनिधी रघुनाथ पाटील म्हणाले.



### रस्त्यांवर ट्रॅक्टर आडवे घालणार

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, नगर, कोल्हापूर, सोलापूरसह राज्यातील सर्व जिल्हा व तालुक्यांच्या शहरांना दूध, भाजीपाला, फळे, अन्नधान्य, अंडी, मांस यांचा पुरवठा येत्या १ जूनपासून करायचा नाही. मुंबईकडे जाणारे सर्व ६० रस्ते अडवायचे त्यासाठी एक हजार ट्रॅक्टर रस्त्यात आडवे उभे करायचे अशी व्यूहरचना आखण्यात आली. जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयासमोर धरणे धरून त्यांना निवेदन देण्यात येणार आहे.

# 'मोदींनी शेतकऱ्यांना फसविले'

**म. टा. प्रतिनिधी,** पुणे



'लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे, शेतमालास हमी भाव देण्याचे आणि स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी लागू करण्याचे आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिले होते. पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कोणत्याही प्रकारचा निर्णय न घेऊन, शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. पण एका निवडणुकीत फसवले, तसे पुढच्या निवडणुकीत फसवता येणार नाही,' असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व खासदार राजू शेट्टी यांनी सोमवारी पुण्यात केली.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे ते मुंबईदरम्यान २२ ते ३० मे या कालावधीत आत्मक्लेश यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या शेतकऱ्यांसह या पदयात्रेत तृतीयपंथी आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुलेही सहभागी झाली आहेत. ही पदयात्रा नऊ दिवस चालेल.

### 'काही वाटसरू भरकटले'

या आत्मक्लेश पदयात्रेत राज्यमंत्री सदाभाऊ खोत सहभागी झाले नव्हते. याबाबत विचारले असता, 'दीर्घ काळाच्या प्रवासात जर काही वाटसरू भरकटत असतील, तर त्यांच्यासाठी विचार न करता पुढे जाणे हेच शहाणपण आहे. राज्यात स्वाभिमानी संघटनेचे लाखो कार्यकर्ते असून, ते यात्रेतदेखील हजारोंनी सहभागी झाले आहेत,' अशी प्रतिक्रिया राजू शेट्टी यांनी व्यक्त केली.

## नगरमध्ये कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**नगर :** जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील डोंबाळवाडी शिवारातील आबा धोंडीबा थोरात (वय ४५) या शेतकऱ्याने रविवारी आपल्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. आबा थोरात यांच्यावर खासगी सावकाराचे व ऊस तोडणीसाठी टोळीवाल्याकडून घेतलेल्या उचलीचे कर्ज असण्याची शक्यता आहे. थोरात यांच्या मागे पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे. डोंबाळवाडीच्या शिवारात आबा धोंडीबा थोरात यांनी आपल्या स्वतःच्या शेतातील बांधावरील लिंबाच्या झाडाला गळ्यातील गमशाने गळफास घेऊन आत्महत्या केली. चौकशीत थोरात यांच्या चार एकर शेतीत कांदा झाला होता; मात्र, त्याचे विशेष पैसे झाले नाहीत.

# सावित्रीच्या लेकींचे श्रमदान

**म. टा. वृत्तसेवा,** सातारा

सातारा जिल्ह्यातील पवार वाडीत राष्ट्र सेवा दलातील सावित्रीच्या लेकींसमवेत राज्यभरातून आलेल्या शेकडो राष्ट्र सेवा दल सैनिकांनी श्रमदान केले. श्रमदान करणाऱ्यांमध्ये तरुणींची संख्या लक्षणीय होती.

मुंबई, पालघर, पनवेल, सिंधुदुर्ग, नाशिक, मालेगाव, पुणे, सातारा, सांगली, मिरज, कोल्हापूर, इचलकरंजी, सोलापूर अशा राज्यभरातील सेवा दल शाखांमधून कार्यकर्ते श्रमदानासाठी पवार वाडीत दाखल झाले होते. शेकडो झाडे लावण्यासाठी त्यांनी खड्डे खोदले. येत्या पावसाळ्यात तिथे झाडे लावली जाणार आहेत. इचलकरंजीच्या कार्यकर्त्यांनी सीड बँकेच्या माध्यमातून शाळा-शाळांतून गोळा केलेल्या हजारो बिया त्यांनी गावच्या सरपंचांकडे दिल्या. यापुढे स्मार्ट व्हिलेज करण्याचा संकल्प या गावचे सरपंच राजेंद्र पवार यांनी सोडला.

या शिबिरात लेक लाडकी अभियानाच्या वर्षा देशपांडे, शाहीर कैलास जाधव, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. अभिजीत वैद्य, तरुण कीर्तनकार सचिन पवार, राजेंद्र पवार, वसंतदादा पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सचिन माने, पत्रकार अश्विनी सातव, राजाभाऊ अवसक, प्रा. रामदास निकम यांनी दोन दिवस मार्गदर्शन केले.

धर्माच्या नावावर जे राजकारण सुरू आहे, त्याविरोधात श्रमदानासोबतच वैचारिक श्रमदान करण्याची गरज डॉ. अभिजीत वैद्य यांनी व्यक्त केली. राष्ट्र सेवा दलाचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष अल्लाउद्दीन शेख, मुंबईचे कार्याध्यक्ष शरद कदम, संजय रेंदाळकर, सचिव नचिकेत कोळपकर, विद्याधर ठाकूर, कोल्हापूर जिल्हा कार्याध्यक्ष हेमंत डिग्रजे, छात्र भारतीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष दत्ता ढगे, सुनील स्वामी, दामिनी पवार, उषा कोष्टी, वैशाली हुबळे, शोभा स्वामी, श्वेता दिब्रिटो उपस्थित होते.



सातार्‍यातील पवार वाडीत राष्ट्र सेवा दल कार्यकर्त्यांचा 'हरित प्रकल्प'



### शिबिराआधीच मुख्यमंत्री भेट

या छावणीच्या आदल्या दिवशीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गावाला भेट दिली. सेवा दल कार्यकर्ते दोन दिवस गावात येणार म्हणून तर मुख्यमंत्र्यांची भेट आयोजित करण्यात आली नाही, अशी कुजबुज या परिसरात सुरू होती. हाच मुद्दा छेडत राजेंद्र पवार म्हणाले, 'पवारवाडीत इतक्या वर्षांत कधीही राज्यमंत्री किंवा कॅबिनेटमंत्रीही आले नव्हते. परंतु शिबिराच्या आदल्या दिवशी थेट मुख्यमंत्रीच गावात आले, ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे.'

# मुलीचा विनयभंग; तीन वर्षे सक्तमजुरी

**म. टा. प्रतिनिधी,** औरंगाबाद

शिकवणीवरून घरी जात असताना १६ वर्षीय मुलीचा विनयभंग करणाऱ्या तरुणाला जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. कर्णिक यांनी तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

याप्रकरणी १६ वर्षीय मुलीने फिर्याद दिली होती. त्यानुसार १४ ऑक्टोबर २०१४ रोजी ही मुलगी शिकवणीवरुन घरी जाताना राधास्वामी कॉलनी परिसरात आरोपी सुनील भाऊसाहेब बोरडे (वय १९, रा. औरंगाबाद) हा तिच्या मागून आला व गालावरून हात फिरवत लज्जास्पद कृत्य केले. त्यामुळे मुलीने आरोपी तरुणाच्या श्रीमुखात भडकावली. या प्रकाराने परिसरातील नागरिक जमा होताच तरुण पळून गेला. हा प्रकार मुलीने वडिलांना सांगितल्यानंतर बेगमपुरा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध कलम ३५४ (अ) व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ व ८अन्वये गुन्हा दाखल झाला. दोन्ही बाजुंच्या युक्तिवादानंतर व साक्ष-पुराव्यांवरून आरोपीला कलम ३५४ (अ) व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये तीन वर्षे सक्तमजुरी व तीन हजार रुपये दंड ठोठावला.

**Dr. Babasaheb Ambedkar Research & Training Institute (BARTI), Pune**
(Autonomous Institute of the Dept. of Social Justice & Special Assistance, Govt. of Maharashtra)
28, Queen's Garden, Camp, Pune - 411 001.

**Invitation of Bids for Annual Contract for Supply of Housekeeping Cleaning Material and General Provisions / Items / Material**

Director General, Dr. BabasahebAmbedkar Research and Training Institute (BARTI), An Autonomous Institute of Social Justice Department, Govt. of Maharashtra, invite online Bids, from eligible & authorized Firms / Agencies in two bid systems (Technical bid and Commercial bid) for "Annual Contract for supply of Housekeeping Cleaning Material and General Provisions / Items / Material".

- For the detailed bid document, interested bidders can visit website **https://maharashtra.etenders.in, https://swd.maharashtra.etenders.in** and submit their bid online.
- Tender Downloading and Preparation from **23/05/2017 (12:01 Hrs.) to 12/06/2017 (16:00 Hrs.)**
- Last date to submit the bid is **13/06/2017 (16:01 Hrs.) to 15/06/2017 (12:00 Hrs.)**
- Pre Bid Meeting will be held on **30/05/2017 at (16:00 Hrs.)** at BARTI Office.
- Director General, BARTI, Pune reserve the right to reject or cancel any or all Bid

**Advt/Tender/23/05/2017/64** **Director General, BARTI**

**GODFREY PHILLIPS INDIA LIMITED**
**REGISTERED OFFICE :** 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033
**CORPORATE OFFICE :** 49, Community Centre, Friends Colony, New Delhi - 110 025
**CIN NO.:L16004MH1936PLC008587**
**Website: www.godfreyphillips.com; Email: isc–gpi@modi.com**

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, it is hereby notified that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Tuesday, the 30th May, 2017 at 12.30 P.M. to, inter-alia, consider and approve the Audited Financial Results for the year ended 31st March, 2017 and also to recommend dividend if any, on the share capital of the Company.

The information contained in this notice is also available on the Company's Corporate website, www.godfreyphillips.com and on the website of the stock exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com.

**For GODFREY PHILLIPS INDIA LIMITED**
Sd/-
(Sanjay Gupta)
Company Secretary

Place : New Delhi
Dated : 23rd May, 2017

